CURRENT GLOBAL REVIEWER
Half Yearly - Nov. 2018 -Apr. 2019 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X Vol III , Feb. 2019 | Sr. No. 64310 | Impact Factor : 7.139

# मराठा सेवा संघाची पंचसूत्रांमधील राजसत्ताचे महत्त्व

**प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, दिंगबराव बिंदु महाविद्यालय, ता. भोकर, नांदेड
**प्रा. सय्यद आर. आर.**
शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

----------------- (14) -----------------------------------------------------------------------------------

**प्रस्तावना :**

मराठा समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मराठा सेवा संघाने मराठा समाजाची उन्नती करण्यासाठी त्यांच्या जीवनामध्ये उत्साह आणि ऊर्जा कायमस्वरुपी निर्माण करण्यासाठी प्रत्येक व्यकतीला प्रेरणादायक काहीतरी तत्त्व असावीत, काहीतरी सुत्र असावीत या विचारांतून मराठा सेवा संघ व मराठा समाजास प्रोत्साहित आणि उत्साहित करणाऱ्या विचारांना परिणामकारक माणून पुरुषोत्तम खेडेकर साहेबांनी मराठा -कुणबी सामाजाच्या विकासासाठी पंचूसत्री स्वीकारली आहेत तीच पंचसूत्री मराठा सेवा संघाची पंचसूत्री म्हणून ओळखली जातात.

**संशोधनाची उद्दीष्ट :**

- प्रस्तुत लघुशोध निबंधासाठी काही उद्दिष्ट निश्‍चित करण्यात आली आहेत.
- मराठा सेवा संघातील पंचसुत्री सत्तांचा अभ्यास करणे.
- मराठा सेवा संघातील राजसत्ता पंचसुत्राचा अभ्यास करणे.
- मराठा सेवा संघातील राजसत्ता पंचसुत्रीच्या महत्त्वाचे अध्ययन करणे.

**संशोधनाची गृहितके :**

- **मराठा सेवा संघातील पंचसुत्री हे मराठा समाजाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.**
- **मराठा सेवा संघ हा महाराष्ट्रात विकासित होत आहे.**

मराठा सेवा संघातील पचंसुत्री मध्ये अर्थसत्ता, शिक्षणसत्ता, धर्मसत्ता, राजसत्ता व प्रसारमाध्यामांची सत्ता यांचा समावेश होतो. यातील एक महत्त्वपूर्ण सुत्र म्हणजे राजसत्ता होय त्याचे विवेचन करण्यात आलेले आहे.

**पंचसूत्र राजसत्ता :**

विश्वात राजसत्ता या सत्तेस सर्वात अधिक महत्त्व असल्याचे दिसून येते. राजसत्ता ज्या व्यक्ती किंवा गटाकडे असेल त्यांचे कोणतेही कार्य थांबत नसल्याचे दिसून येते. आजच्या राजकारणी व राज्यसंस्थांचा इतिहास पाहता अनेक राजकारणी नेत्यांचे नातेवाईक प्रत्येक वेळेस सत्तेत असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास गतीने होण्यास मदत होते. राजसत्ता ही प्रत्येक व्यक्ती व गटाच्या विकासाचे एक सर्वोत्तम साधन मानले जाते. यामुळे लोकमान्य टिळकांनी स्वराज्याची मागणी केली. आपल्या स्वराज्यामध्ये राज्यकर्ते आणि लोक हे एकाच देशाचे, प्रांताचे, धर्माचे अथवा वंशाचे राहतील, लोकांनी निवडून दिलेले आणि लोकांनाच जबाबदार असणारे राज्य, स्वत:च्या देशात, प्रांतातील शासनामध्ये सहभागी होणे हा लोकांचा अधिकार आहे. यास टिळकांनी पाटींबा दिला. मानवी जीवनातील अराजकतेला संपुष्टात आणण्यासाठी

राज्यसंस्थेची निर्मिती करण्यात आली. राज्यसंस्था जंगलाच्या कायद्याला प्रतिबंध करते, तसेच राज्यसंस्था नागरिकांसाठी कायद्याचे व कायदेशीर हक्कांचे पर्यावरण निर्माण करते. राज्यसंस्था ही तत्त्वत: मनुष्याच्या नागरी स्वातंत्र्याची आणि हक्कांची हमी असल्याने प्रत्येक सुबुध्द, सुज्ञाण आणि जबाबदार व्यक्ती मनुष्यसमुदायासाठी राज्यसंस्थेची आवश्यकता असलीच पाहिजे. असा निर्वाळा देईल. असे दुर्गा भागवत यांनी आपल्या लेखात नमुद केले आहे यावरुन स्पष्ट होते की, राज्यसत्ता ही किती महत्त्वपुर्ण सत्ता आहे. त्यामुळे मराठा सेवा संघाने सुध्दा आपल्या पंचसूत्री मध्ये राजसत्ता प्राप्त करण्याचे ध्येय ठेवले आहे.

नागरिकांच्या समृध्द व सर्वांगीण जीवन जगण्यासाठीच्या अडथळांना लोकशाही व कायदेशीर मार्गाने नष्ट करणे आवश्यक आहे. देशातील नागरिकांचे परकीय व अंतर्गत अन्याय, अत्याचार, हिंसेपासून संरक्षण केले पाहिजे. जनतेसाठी जास्तीत जास्त सुख सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत यासर्व उद्दिष्टांच्या पुर्तीसाठी आपण राजकारणाकडे एक अपरिहार्य दृष्टीकोनातून पाहतो. मराठा-कुणबी समाजाने राजस्ता, अर्थसत्ता, धर्मसत्ता, शिक्षणसत्ता आणि प्रचार-प्रसार माध्यम सत्ता हाती घेऊन राज्य केले पाहिजे. या पाच सत्ताद्वारे मराठ्याचे मन, मान, मनका, मनगट, मेंदु, मस्तक सशक्त झाले पाहिजे अशी भूमिका संघटनेद्वारे मांडली जात आहे. महाराष्ट्राचा राजकीय इतिहास पाहता महाराष्ट्रात मराठा समाजाचे वर्चस्व ऐर्शीच्या दशकांपर्यत असल्याचे दिसून येते. महाराष्ट्राच्या राजकारणावर कॉंग्रेस पक्षाचे दीर्घकाळ म्हणजेच १९५६ ते १९७७ पर्यंत एक हाती वर्चस्व राहिले. या कालखंडात यशवंतराव चव्हाणांनी विकसित केलेल्या चौकटीत महाराष्ट्राचे राजकारण घडत राहिले. काँग्रेसने महाराष्ट्रात सहकारी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मार्फत जनतेच्या हितसंबंधाचे राजकारण करुन महाराष्ट्रभर संस्थात्मक जाळे उभारले. यशवंतराव चव्हाणांच्या बेरजेच्या राजकारणामुळे मराठा-कुणबी जातसमूहाने बहुजन समाजाचे प्रतिनिधत्व करण्याची भूमिका घेतल्यामुळे मध्यम जाती, दलित, आदिवासी आणि मुस्लीम समूहही मराठ्यांच्या पाठोपाठ काँग्रेसमागे उभे राहिले. परंतु २०१४ मध्ये झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये महाराष्ट्राचे राजकारण पूर्णत: बदलले गेले. १९९९ ते २०१४ या १५ वर्षाची आघाडी सरकारची सत्ता बदलून भाजपाचे सरकार सत्तारुढ झाले. १९९० पासूनच महाराष्ट्राच्या राजकारणाची संरचना बदलण्यास सुरुवात झाली. परंतु याचा परिणाम म्हणून १९९५ साली पहिले बिगर काँग्रेसी शिवसेना-भाजप युतीचे सरकार निर्माण झाले. १९९९ मध्ये काँग्रेसपक्षात फूट पडून राष्ट्रवादी काँग्रेसचा उदय झाल्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणातील गुंतागुंत आणि स्पर्धात्मकता वाढली. परंतु राजकीय अपरिहार्यतेतून महाराष्ट्रात बहुध्रुवीय पक्षीय स्पर्धेऐवजी द्विध्रुवीय पक्षीय स्पर्धाच पाहायला मिळते. महाराष्ट्रातील काँग्रेसला पूर्णपणे पर्याय देऊ शकला नाही. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत सर्वच पक्ष स्वतंत्र लढले परंतु कोणालाही एक हाती सत्ता आली नाही. गेल्या पंधरा वर्षात जसे पक्ष पध्दतीचे स्वरुप बदलत गेले तसे राजकीय पक्षांचे स्वरुप देखील बदललेले दिसून येते. पक्षांचे बदलते स्वरुप हे पक्ष संघटन, नेतृत्त्व आणि विचार प्रणालींच्या पातळीवर तपासल्यास संघटन-नेतृत्वाबाबतील काँग्रेसकडे आज एकही राज्यस्तरीय प्रभावी नेता नाही. जे आहेत ते जिल्ह्यापुरते मर्यादित आहेत. एकमेकांना संपविण्याचे प्रयत्न करीत संघटनात्मक कार्याचा अभाव यामुळे सत्तेत दीर्घकाळ असूनही हा पक्षाचे वर्चस्व कमी होत आहे. आघाडीच्या राजकारणात विचारप्रणालीपेक्षा सहमती तडजोडींना महत्त्व येते. स्थानिक हितसंबंधातील तडजोडीच्या राजकारणातून स्थानिक स्वराज्य संस्थात, नगरपालिका व महानगरपालिकांमध्ये परस्पर विसंगत आघाड्या महाराष्ट्रात पाहायला मिळतात. पक्षांच्या विचारप्रणालीत मोठी विसंगती आढळते. राष्ट्रवादीने काँग्रेससोबत आघाडी केली पण सतत कुरघोडीचे राजकारण केले. या कुरघोडीतून त्यांनी २०१४ मध्ये भाजपाला बाहेरुन पाठिंबा घोषित केला. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस हा बहुजनांचा की भांडवलारांचा हा पेच निर्माण झाला. एके काळी दलितविरोधी भूमिका घेणाऱ्या शिवसेनेने व्यापक सामाजिक आघाडी उभारण्यासाठी शिवशक्ती-भीमशक्तीच्या

एकीकरणाचे प्रयत्न केले. मनसेने एकीकडे मराठी अस्तिमतेचा मुद्या मांडून दुसरीकडे नरेंद्र मोदींना पाठींबा देऊन हिंदुत्वाचा स्वीकार करायचा. काँग्रेसने धर्मनिरपेक्षता आव आणून दलित-मुस्लिम वोट बँकेसाठी इतरांचे खच्चीकरण करायचे. भाजपने निवडनुकीत राष्ट्रवादीला भ्रष्टाचारी म्हणायचे व स्वार्थासाठी राष्ट्रवादीचा छुपा पाठींबा मिळवायचा. ही सर्वच राजकीय पक्षांच्या वैचारिक अस्पष्टतेची लक्षणे आहेत. २०१४ च्या निवडणुकीत काँग्रेस-राष्ट्रवादीपासून दुरावलेल्या मराठा-कुणबी व ओबीसींचा फायदा सेना-भाजपाला मिळाला. बहुजन समाजाच्या मतांचे विभाजन काँग्रेस-राष्ट्रवादीच्या दारुण पराभवास कारणीभूत ठरले. मराठा-कुणबी हे एकूण लोकसंख्येच्या १/३ असल्यामुळे ते दूर जाणे काँग्रेस-राष्ट्रवादीसाठी धोक्याचे आहे. या पक्षांनी मराठा-कुणबी समाजाला आजवर फक्त गृहितच धरले आहे. समाजाच्या उत्थानासाठी ठोस पावले उचलली नाहीत. हे सगळे जरी खरे असले तरी सर्वच पक्षांच्या मूलभूत धोरणात एकवाक्याता दिसून येते. त्यामुळे बहुजन समाजाचे भले होईल असे अजिबात वाटत नाही.

छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, फुले, आंबेडकर ही महाराष्ट्राची संस्कार केंद्रे आहेत. या महापुरुषांच्या स्वप्नातील समाज घडवायचा असेल तर महापुरुषांच्या विचाराने प्रेरित असलेल्या मराठा-कुणबी, बहुजन समाजाने तन-मन-धनाने एकत्रित येऊन शिवराज्य आणण्यासाठी एकत्र येणे हे काळाची गरज आहे. महापुरुषांचे विचार आत्मसात करुन आपल्या संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी, सर्वांच्या प्रगतीसाठी महाराष्ट्राच्या भल्यासाठी एकत्र येणे गरजेचे आहे. याबाबत डॉ. कुमार सप्तर्षी लिहितात, महाराष्ट्रात व्यापक पायावरचं राजकारण नाही. म्हणजे नेमकं काय? कुणाही परकीयानं आक्रमण केलं तर त्याच्याविरुध्द एकोप्यानं लढावं, ही ईर्ष्या इतिहासात कधी आढळली नाही. छत्रपती शिवाजी महाराज हे एकमात्र अपवाद होते. त्यांचीही अर्ध्यापेक्षा अधिक शक्ती ही स्वकीयांविरुध्द लढण्यात खर्ची झालेली दिसून येते. महाराष्ट्रानं छत्रपतींचं स्वप्न अपूर्ण ठेवलं, नव्हे पराभूत केलं. यामुळे आजच्या परिस्थितीत ब्राह्मण वर्चस्व कमी करुन खऱ्या अर्थाने इतर सर्वांनी एकत्रित येऊन राजकीय सत्ता प्राप्त करणे आवश्यक आहे. सद्य स्थितीत तर संपुर्ण भारतीय राजकारणातील महत्त्वपुर्ण पदांवर ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व दिसून येते. किंवा पूर्वीपासून कोणत्याही पक्षांमध्ये त्यांचेच वर्चस्व आपणास दिसून येते. याबाबत म. ज्योतिबा फुले यांनी म्हटले आहे, शूद्रातिशुद्रांची दिशाभूल करण्यासाठी ब्राह्मण प्रार्थना समाजाचा वापर करत होते. तसेच सार्वजनिक सभा ही जरी सार्वजनिक संस्था असली तरी तिथे ब्राह्मणांचीच मक्तेदारी होती. कारण त्यात कुणबी, माळी, धनगर, कोळी अथवा भिल्ल यांचा समावेश नव्हता. हिंदूसाठी अधिकाधिक जागांची मांडणी जरी सभा करत होती तरी ती दिशाभूल करणारी होती, कारण त्यातून फक्त ब्राह्मणांचाच फायदा होत होता. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये देखील अशीच परिस्थिती होती. तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस मध्ये कोणत्याही शुद्राने जाऊ नये, कारण तिथे ब्राह्मण त्यांची फसवणूक करतील. म्हणून शूद्रांनी शिक्षण घ्यावे आणि राजकीय संघटन करावे.

आजच्या स्वातंत्र्यानंतर ही अनेक क्षेत्रात त्यांचेच वर्चस्व असल्याचे अनेक दाखले दिले जातात. त्यामुळे मराठा सेवा संघ स्थापनेवेळी ही एक अराजकीय संघटना आहे अशी मांडणी केली होती. परंतु पुढे संघटनेने राजकीय भूमिका घेत मराठा सेवा संघाच्या माध्यमातून शिवराज्य पक्ष स्थापन केला. शिवराज्य पक्ष केवळ मराठ्याचा नाही तर विचाराने जे कोणी मराठे असतील त्यांचा आहे व अशाच उमेदवाराला तिकीट दिले जाईल. शिवराज्य पक्षाद्वारे शिवराज्य आणण्याचे ध्येय पक्षाने ठेवलेले आहे. जात, धर्म असा भेद नसलेले शिवराज्य निर्माण करण्यासाठी विचारांची जपणूक करणारी व्यवस्था निर्माण करण्याची गरज होती. शिवराज्य पक्ष स्थापने मागची संघटनेची भूमिका म्हणजे भारतात राष्ट्रीय आणि प्रादेशिक स्तरावर अनेक राजकीय पक्ष आहेत. परंतु काही अपवाद वगळता बहुतेक पक्ष महात्मा फुलेंच्या शब्दात भटजी-लाटजी-शेटजींचे आहेत. हे दहा टक्के लोक नव्वद टक्के बहुजनांचे शोशण करत आहेत हे शोषण घालविण्यासाठी समता, परिवर्तन आणि विज्ञान ह्या तत्त्वावर आधारित शिवराज्य पक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. समाजकारण करणारा हा राजकीय पक्ष

असून एक जनचळवळ आहे. सामाजिक क्षेत्रातील अन्याय, अत्याचार दुर करुन बहुजन समाजाला समतेच्या दिशेने नेण्याचे कार्य शिवराज्य पक्ष करणार आहे. सर्व क्षेत्रातील प्रस्थापितांची मक्तेदारी संपवून भुमीपुत्रांचे राज्य आणावयाचे आहे. शिवराज्य पक्ष ही एक प्रशिक्षित, स्वाभिमानी व लढाऊ चळवळ होय. भट, भय, भूक व अज्ञानमुक्त समाज निर्मिती करण्यासाठी शिवराज्य पक्षाची स्थापना केली. एकंदरीत ही शिवराज्य पक्ष स्थापनेमागची मराठा सेवा संघाची भूमिका होती. राजसत्ता प्राप्त करणे हा मुळ उद्देश होता.

**संदर्भसूची :**

०१. जाधव शिरीष, 'मराठा सेवा संघ', जिजाई प्रकाशन, सिंदखेड राजा, जाने.२०१२
०२. जखोटिया गिरीश, 'मराठा समाजाच्या सर्वंकष विकासाची पंचसूत्री', (संपा) एरंडे व्ही.एल., मराठा क्रांती मोर्चे : का व कशासाठी?, कुसुमाग्रज प्रकाशन, नाशिक, २०१७.
०३. जगताप राम, धसकटे सुशील (संपा), 'मराठा समाज वास्तव आणि अपेक्षा', (लेख) सप्तर्षी कुमार, पॉवर अन् वावर, राजहंस प्रकाशन, पुणे,२०१३
०४. बरुरे शैलजा, 'राजकारण ही समाजसेवा', ब्रिज मोहान दायमा,(संपा) बदलते भारतीय शिक्षण, अर्थकारण, समाजकारण व राजकारण, अरुणा प्रकाशन, लातूर, २०१२
०५. बसू दुर्गादास, 'भारतीय राज्यघटनेची ओळख', लेक्सिस नेक्सिस पब्लिकेशनस, गोरेगाव, हरियाना, प्रथमा मराठी आवृत्ती, २०१४